**कृपया प्रसिद्धीसाठी** **०५.०५.१९**

**लष्कर पोलीस ठाणे,**
**पुणे शहर**

**वयस्कर व अंध महिलेस सुखरूप घरी पोचवले.**

लष्कर पोलीस ठाण्याचे चारबावडी परिसरातील मार्शलचे कर्मचारी पोलीस शिपाई शिरगिरे आणि पोलीस शिपाई सरगर दिवसपाळीचे काम करत होते. पुणे कॅम्पमधील शितळादेवी मंदिरासमोर एका अंध महिलेस सोडून देण्यात आले आहे असे त्यांना स्थानिकांकडून समजले. त्यानुसार वरील मार्शल आणि महिला पोलीस शिपाई साळुंखे त्या ठिकाणी गेले आणि त्या अंध महिलेस रिक्षेतून पोलीस ठाण्यात घेऊन आले. त्या महिलेची विचारपूस केल्यावर तिचे नाव ग्रेस कांबळे (नाव बदलले आहे) व रामटेकडी येथील पत्ता समजला. मार्शलने त्या परिसरात जाऊन महिलेचा फोटो दाखवून माहितीची व पत्त्याची खातरजमा केली. एका रिक्षाचालकाकडून त्या महिलेच्या घरचा नेमका पत्ताही समजला. त्या पत्त्यावर चौकशी केली असता त्या महिलेचे नातेवाईक तिथे राहत असल्याचे आढळले. त्यांच्याकडून महिलेच्या मुलीचे नाव व ससाणेनगर येथील पत्ता मिळाला. त्यानुसार ग्रेस कांबळे यांना त्यांच्या मुलीच्या घरी नेऊन मुलीकडे सुपूर्त केले.